e-ISJN: A4372-3088
p-ISJN: A4372-3089

ISSN: 2394-3122 (Online)
ISSN: 2394-6253 (Print)
Impact Factor: 6.03

Volume 11, Issue 12, December 2024

SK International Journal of Multidisciplinary Research Hub

Journal for all Subjects

Research Article / Survey Paper / Case Study

Published By: SK Publisher

(www.skpublisher.com)

A Monthly Double-Blind Peer Reviewed Refereed Open Access Multidisciplinary & Multilingual International Journal

Special Issue: Two Day National Interdisciplinary Conference on "Script Writing"

Organised by: Department of Languages, Shankarlal Khandelwal Arts, Science & Commerce College, Akola, Maharashtra 444002.

(Sponsored by Pradhan Mantri Uchchatar Shiksha Abhiyan Grants to Strengthen Colleges)

# माहितीपटाचे संहिता लेखन

**निलेश श्रीकृष्ण कवडे**[१]
संशोधक विद्यार्थी
सहायक अध्यापक जि.प. प्राथमिक शाळा
टाकळी जलम
पं.स. अकोला जि. अकोला

**प्रा. डॉ. शिवाजी नागरे**[२]
मराठी विभाग प्रमुख
शंकरलाल खंडेलवाल विज्ञान, कला,
वाणिज्य महाविद्यालय
अकोला

DOI: https://doi.org/10.61165/sk.publisher.script.writing.2024.43

*प्रस्तावना : औद्योगिक क्रांतीच्या पार्श्वभूमीवर चित्रपट कला उदयाला आली. हळूहळू तिचा विकास झाला. १९१२ मध्ये दादासाहेब तोरणे आणि दादासाहेब फाळके यांच्या चित्रपट निर्मितीने भारतीय संस्कृतीचे विषय असलेली चित्रपट संस्कृती निर्माण झाली. आधी मूकपट असलेल्या चित्रपटांना ध्वनीची जोड मिळाली. आजच्या संगणकीय काळात चित्रपटाच्या माध्यम आणि आशय द्रव्यांमध्ये आमूलाग्र बदल होत चालले आहेत. चित्रपट चळवळीतून माहितीपटाचा जन्म झाला. माहितीपट हा लघुचित्रपटापेक्षा वेगळा असतो. माहितीपटाच्या माध्यमातून संबंधित विषयाबाबत माहिती विस्तृतपणे आणि कल्पकतेने दिली जाते. ही माहिती देण्यासाठी माहितीपटाची संहिता लिहिली जाते. माहितीपट बनवताना पहिली पायरी म्हणजे माहितीपटाची संहिता लेखन होय. माहितीपट ही चित्रपटाची सूक्ष्म शैली असते. माहितीपट व्हिडिओ कॅमेरा वर्क पार्श्व संगीत आवाज छायाचित्र दृश्य यांचा संदर्भ घेऊन बनवला जातो. संहिता आणि इतर तांत्रिक बाबी यांचे संपादन केल्यावर माहितीपट पूर्ण होतो.*

*मुख्य शब्द: संहिता, माहितीपट, लघु चित्रपट, डॉक्यू-ड्रामा.*

**माहितीपट म्हणजे काय?**

मराठी विश्वकोशानुसार "व्यक्ती, कृती किंवा घटना यांचे वास्तवदर्शन घडविणारे चित्रपट म्हणजे माहितीपट होय. काल्पनिकतेला स्थान न देता घडणाऱ्या घटनांपैकी, वास्तवापैकी काहींची नोंद करून, मुद्रित करून संकलित केलेले चित्र म्हणजे माहितीपट"

बिल निकॉल्स यांच्या मते "माहितीपट हे एक चित्रपट निर्मितीचे साधन, एक सिनेमाई परंपरा आणि प्रेक्षकांच्या ग्रहणशक्तीचा एक प्रकार आहे, ज्याची स्पष्ट सीमा नाही."

© 2024, SK Publisher All Rights Reserved

पॅरे लॉरेन्ज म्हणतात, “माहितीपट म्हणजे एक तथ्यात्मक चित्रपट जो नाट्यमय असतो.”

जॉन ग्रीअरसन म्हणतात, “माहितीपट म्हणजे वास्तविकतेचे सर्जनशील उपचार.”

एरॉल मॉरिस म्हणतात, “माहितीपट म्हणजे जगाला शोधण्यासाठी, प्रश्न विचारण्यासाठी प्रतिमांचा वापर करणारा चित्रपट.”

मायकेल मूर यांनी माहितीपटाची व्याख्या करताना म्हटले आहे की, “माहितीपट म्हणजे एक कथा सांगणारा चित्रपट, ज्याचे एक दृष्टिकोन असते.”

माहितीपटांचे हेतू मुख्यतः मार्गदर्शन करणे, माहिती देणे, नोंद करणे किंवा दस्तऐवज म्हणून जतन करणे हे असतात. माहितीपटाला ‘अनुबोध पट’ असेही म्हणतात.

**माहितीपट आणि डॉक्यू ड्रामा -**

डॉक्यू ड्रामा ही अलिकडच्या काळामध्ये प्रसिद्ध होत असलेली माहितीपटाची पुढची आवृत्ती आहे. याचे स्वरूप माहितीपटाचेच असते केवळ डॉक्यू-ड्रामाच्या कथानका

मध्ये गरजेनुसार काही सीन शूट केल्या जातात. माहितीपटामध्ये जिवंतपणा येण्यासाठी छोटे छोटे सीन घेतले जातात.

**माहितीपटाचे स्वरूप**

१८९५ मध्ये ल्यूमेअर बंधूंनी दाखवलेल्या पहिल्या मूक-चलचित्रफिती हे माहितीपट किंवा नोंदपटच होते. स्थानकामध्ये येणारी आगगाडी, कारखान्यांतून बाहेर पडणारे लोक अशा घटना कॅमेरा समोर ठेवून चित्रित करणे, ही हालणारी हुबेहूब चित्रे पडद्यावर दाखवून प्रेक्षकांना अचंबित करणे एवढाच त्यांचा मर्यादित हेतू तेव्हा होता. अशा चित्रफीतींना प्रत्यक्षदर्शन (Actuality) म्हटले गेले. त्यानंतर १८९८ ते १९०६ या काळात युजिन-लुई डॉयन या शल्यविशारदासाठी बोलिस्लाव्ह मातुझेव्हस्की (Boleslav Matuszewski) या पोलिश छायाचित्रकाराने अनेक शस्त्रक्रिया चलचित्रित केल्या. त्या माहितीपट म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या.

१८९६ मध्ये हरिश्चंद्र सखाराम भाटवडेकर ऊर्फ सावे दादा यांनी मुंबईतील हॅंगिंग गार्डन येथे कुस्तीचे चित्रण केले. द रेस्लर हा भारतातला आणि भारतीयाने तयार केलेला पहिला माहितीपट होय. त्यांनी १९०३ पर्यंत सर रॅंगलर, मि. आर. पी. परांजपे, मॅन अँड हिज मंकी, दिल्ली दरबार इत्यादी सात माहितीपट केले. १९०० ते १९२० या दरम्यान रम्यस्थळांच्या प्रवासविषयक चित्रफिती लोकप्रिय झाल्या. १८९६ मध्ये सुरू झालेली Pathe ही फ्रेंच कंपनी १९०० पासून माहितीपटांची निर्मिती, वितरण करणारी सगळ्यात मोठी संस्था होती. ती अजूनही कार्यरत आहे. १९१४ मध्ये इन द लॅंड ऑफ हेडहंटर्स हा एडवर्ड हंटर यांनी कॅनडातल्या मूळवासी (इंडियन) लोकांना अभिनेते म्हणून घेऊन वास्तवदर्शी पद्धतीने माहितीपट केला होता. त्यानंतर १९२२ मध्ये रॉबर्ट फ्लाहर्टी यांनी ‘नानुक ऑफ द नॉर्थ’ हा कॅनेडियन आर्क्टिक प्रदेशातल्या कुटुंबावर माहितीपट केला. या काळापर्यंत चित्रपटांचे ललितनाट्य आणि माहितीपट असे स्वतंत्र प्रकार धरले जात नसत; परंतु आता अशा चित्रपटांना नाट्यीकृत-माहितीपट (डॉक्युड्रामा) म्हणतात.

भारतात ब्रिटिश काळात ‘फिल्म ॲडव्हायजरी बोर्ड’ ‘इन्फर्मेशन फिल्म्स ऑफ इंडिया’ आणि ‘इंडियन न्यूज परेड’ या संस्थांतर्फे

© 2024, SK Publisher All Rights Reserved

माहितीपटांची निर्मिती होत असे. स्वातंत्र्यानंतर १९४८ साली 'फिल्म्स डिव्हिजन ऑफ इंडिया' या संस्थेची स्थापना झाली. १९१६ सालातल्या सिनेमॅटोग्राफ कायद्याचे भारतीयीकरण १९५२ मध्ये झाले आणि चित्रपटगृहांत मुख्य चित्रपटांच्या आधी माहितीपट/बातमीपत्रे दाखवणे अनिवार्य झाले. दूरचित्रवाणीचा प्रसार होईपर्यंत हे चालू होते. नंतर सरकारी अखत्यारीतील दूरदर्शन या वाहिनीवरून माहितीपट प्रसारित केले जाऊ लागले. स्वतंत्र भारताच्या सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक इतिहासाच्या नोंदी करण्याचे महत्त्वाचे काम फिल्म्स डिव्हिजनने निर्मिती केलेल्या माहितीपटांनी केले. त्याचबरोबर कलात्मक माहितीपटही तयार झाले. हे माहितीपट संस्थेतल्या आणि बाहेरच्या नामांकित निर्माता-दिग्दर्शकांनीही केले.

**माहितीपटाचे संहिता लेखन**

माहितीपट बनवण्याच्या आधी पद्धतशीरपणे संबंधित विषयाचा अभ्यास करावा लागतो. विविध पुरावे संकलित करावे लागतात. माहितीचे संकलन केल्या जाते. संकलित माहिती मधून आवश्यक असलेली या माहितीला संपादित केले जाते. त्या माहितीचा क्रम ठरवला जातो. त्याची कथात्म पद्धतीने मांडणी केली जाते. त्याच्या प्रत्येक वाक्यानुसार, उतार्‍यानुसार दाखवायचे पुरावे, छायाचित्र आणि व्हिडिओ; कुठे आणि कसे समाविष्ट करायचे हे ठरवले जाते. माहितीपटाला साजेसे पार्श्व संगीत ठरवले जाते. ही सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच माहितीपटाची संहिता बनते. माहितीपटाच्या संहितेचा कालावधी अवकाश ठरवला जातो. त्यानुसार संपादन केले जाते. संहिता बनल्यानंतर माहितीपटाच्या संहितेचे स्टुडिओमध्ये अभिवाचन केले जाते. आरोह-अवरोहयुक्त आणि श्रवणीय आवाज यासाठी वापरला जातो. ज्या आवाजाचा परिणाम दीर्घकाळ राहील असा आवाज निवडला जातो. हल्ली याकरिता प्रशिक्षित व्हाईस आर्टिस्ट उपलब्ध आहेत. स्टुडिओमध्ये करावयाच्या तांत्रिक बाबीआधी संहिता अत्यंत महत्त्वाची असते. माहितीपटाची संहिता ही माहितीपटाचा प्राण असतो. रेकॉर्डिंग झाल्यावर सुद्धा संहितेनुसार माहितीपट बनला आहे की नाही याची खातरजमा केली जाते. एकंदर माहितीपटामध्ये संहिता लेखन अत्यंत जबाबदारीचे काम असते.

**डॉक्यु ड्रामा माहितीपटाचे संहिता लेखन**

डॉक्यु-ड्रामा माहितीपटामध्ये काही प्रसंग रिक्रिएट केले जातात. त्यासाठी काही 'सीन' शूट केल्या जातात. मूकनाट्याचा आधार घेतला जातो तर कधी संवादांच्या सहाय्याने सुद्धा प्रसंग रिक्रिएट केले जातात.

**माहितीपटाच्या संहितेचे महत्त्वाचे घटक**

माहितीपटाचे संहिता लेखन करताना पुढील घटकांना अनुसरून लेखन करणे आवश्यक असते. नियोजनबद्ध आणि शास्त्रशुद्ध पद्धतीने लेखन केल्यास संहिता आटोपशीर बनते. आणि कथा भरकटण्याचा धोका राहत नाही. माहितीपटाचे संहिता लेखन करताना पुढील मुख्य घटक लेखकाने लक्षात घेतले पाहिजे.

**१) संशोधन आणि व्यक्ती अभ्यास**

ज्या माहितीपटाची संहिता लिहायची आहे. त्या विषयासंदर्भात सत्य आणि वास्तव दर्शविणारे पुरावे शोधावे लागतात. सबळ

पुराव्याशिवाय संहितेला विश्वासार्ह्यता येत नाही. व्यक्तीच्या बाबतीत केस स्टडी द्वारे संबंधित व्यक्तीची माहिती संकलित केली पाहिजे. इतर वेळी वस्तुस्थिती दर्शविणारे विविध पुरावे आवश्यक असतात. केवळ ऐकीव माहितीवर आधारित संहिता लेखन करता येत नसते.

**२) मुलाखत**

माहितीपटाचे संहिता लेखन करताना संबंधित विषयासंदर्भात विविध व्यक्तींच्या मुलाखती घ्याव्या लागतात. मुलाखतीचे चित्रीकरण सुद्धा करावे लागते. माहितीपटामध्ये योग्य तिथे मुलाखतीमधील काही अंश समाविष्ट करता येतो. मुलाखतीच्या माध्यमातून अधिकाधिक वास्तवदर्शी माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला गेला जातो. मुलाखती करिता निवडण्यात येणाऱ्या व्यक्ती या संबंधित विषयाशी निगडीत असायला हव्या.

**३) पुरावे**

माहितीपटाचे संहिता लेखन करताना संहितेमध्ये जी विधाने केली जातात त्या विधानांना ठोस आधार लागतो. अशावेळी पत्रे, ताम्रपत्र, शिलालेख, शिल्प, ऐतिहासिक दस्तऐवज, विविध संदर्भ ग्रंथ, छायाचित्र असे विविध पुरावे पडताळून त्यांच्या नोंदी ठेवाव्या लागतात. पुरावाच्या नोंदी असल्या तर संहितेमध्ये संशयाला वाव राहत नाही. प्रत्यक्ष माहितीपटामध्ये योग्य तिथे पुरावे वापरले तर माहितीपट वास्तवदर्शी बनतो.

**४) संगीत**

माहितीपटाच्या संहिता लेखनाच्या वेळी आवश्यक तिथे संगीताबाबत सूचना दिल्या गेल्या तर संपादन करताना सोपे जाते. योग्य तो संदेश प्रभावीपणे या माध्यमातून दिला जातो. लेखकाला जे सांगायचे आहे ते पोचवण्यास याने मदत होते. एडिटर दिग्दर्शकाच्या सूचनेनुसार आणि मागणीनुसार संगीताची व्यवस्था करतो. पार्श्व संगीतामुळे माहितीपट प्रभावी आणि श्रवणीय होतो. माहितीपटामधील एखादे वातावरण निर्माण करण्यासाठी संगीताचा उपयोग होतो.

**५) अभिवाचक**

माहितीपटाच्या संहितेचे अभिवाचन करणाऱ्या व्यक्तीची निवड त्याच्या आवाजाचा पोत आपल्या संहितेला अनुकूल आहे की नाही हे पडताळणी केली जाते. अभिवाचन करताना आरोह-अवरोह योग्य तिथे वापरावा लागतो. आवाजातील चढउतारामुळे नेमक्या भावना पोहोचवता येणे शक्य होते. सहितेतील वातावरणाला साजेसा आवाज असला तर प्रभाव उत्कृष्ट पडतो. आवाज प्रभावी नसेल तर चांगल्या संहिता सुद्धा प्रभावहीन होण्याचा धोका संभवतो. Voice Over चांगल्या स्टुडिओमध्येच केले पाहिजे. त्यामुळे माहितीपटाचा दर्जा उंचावतो.

**६) कथानक आणि कथानकाचा क्रम**

माहितीपटाच्या संहितेचे लेखन करताना कथानकाचा क्रम अत्यंत आवश्यक असतो. क्रम व्यवस्थित ठरवला गेला नाही तर

माहितीपट आकलन व्हायला कठीण जातो. त्यामुळे कथानकाचा क्रम लावणे आवश्यक असते. कथानकामध्ये आरंभ, मध्य आणि शेवट अशा पद्धतीने रचना असायला हवी. कथानकामध्ये एकसूत्रीपणा असायला हवा. कथानकाची गती प्रेक्षकांना झेपेल अशी हवी. संपूर्ण कथानकामध्ये मूळ कथा सांभाळली जाणे आवश्यक असते. याची संहिता लेखकाने जाणीव ठेवावी.

**७) कॅमेरा**

माहितीपटामध्ये चित्रपटाच्या तुलनेने कॅमेरा वर्क कमी असते. मुलाखत तसेच डॉक्यू-ड्रामा मध्ये काही प्रमाणात दृश्य पुनर्निर्मित केले जातात. अशावेळी चांगल्या प्रतीचा कॅमेरा असला तर चलचित्रण दर्जेदार करता येते.

**८) कालावधी आणि अवकाश**

माहितीपटाचा कालावधी किती असावा असे निश्चित नाही मात्र सामान्यपणे कमी शब्दात जास्तीत जास्त आशय सांगितला गेला पाहिजे, या आधारावर संहितेची रचना असायला हवी. कालावधीच्या बाबतीत माहितीपट हा कमीत कमी लांबीचा असावा. दीर्घ कालावधीचे माहितीपट प्रेक्षकांना रटाळ होण्याचा धोका संभवतो.

**९) संवाद**

माहितीपटामध्ये फारसे संवाद नसतात. डॉक्यु ड्रामा माहितीपटामध्ये दृश्यानुसार संवाद असतात. माहितीपटाच्या संहितेमध्ये निवेदकच संवादाचे वाचन कथन पद्धतीने करतो.

**१०) वर्णन आणि वातावरण**

एखाद्या संहितेमध्ये संहितेचा नायक एखाद्या क्ष नावाच्या व्यक्तीला भेटतो. ती व्यक्ती त्याच्या जीवनामध्ये अत्यंत महत्वाची असते. मात्र ती क्ष व्यक्ती कोण हे प्रेक्षकांना समजले पाहिजे त्यासाठी आवश्यक त्या पद्धतीने लिखाणामध्ये उल्लेख यायला हवे. एखाद्या स्थळाचे वर्णन आवश्यक तेवढे केले पाहिजे. माहितीपटाच्या संहितेमध्ये आलेल्या संज्ञा संकल्पना यांचा अर्थबोध स्पष्ट होईल इतके वर्णन माहितीपटाच्या संहितेमध्ये यायला हवे. माहितीपटामध्ये वातावरण निर्मितीच्या उद्देशाने काही विधाने केली जातात. उदा. युद्धावर आधारित माहितीपटामध्ये युद्धाची पार्श्वभूमी रोचक पद्धतीने सांगावी लागते. बऱ्याचदा वातावरण निर्मितीसाठी संगीताचा आधार घेतला जातो.

**११) संदेश**

माहितीपट निर्मितीचा उद्देश काय? हे संहिता लेखकाने लक्षात ठेवूनच लिखाण करायला हवे. मूळ उद्देशापासून दूर जाऊ नये याची काळजी घेतली पाहिजे. माहितीपटाच्या माध्यमातून देण्यात येणारा संदेश प्रभावीपणे दिला गेला आहे का याची खातरजमा लेखकाने करावी.

© 2024, SK Publisher All Rights Reserved

**१२) पात्र**

माहितीपटाच्या संहितेमध्ये पात्रांची संख्या मर्यादित असावी. मुख्य पात्रांवर अधिक लक्ष केंद्रित करायचे असल्यामुळे पात्रांची संख्या कमी असायला हवी.

**१३) तांत्रिक सूचना**

माहितीपटाची निर्मिती आणि संपादन करताना लेखकाने तांत्रिक सूचना दिलेल्या असल्या तर संपादकीय संस्कार करताना विशेष अडचणी येत नाहीत. संहितेमध्ये तांत्रिक सूचना स्पष्ट दिलेल्या असल्या तर एडिटिंग करणे फार सुलभ जाते.

**माहितीपटाच्या संहितेची वैशिष्ट्ये**

माहितीपटाचे संहिता लेखन करताना पुढील मुद्द्यांना अनुसरून लिखाण करायला हवे.

**१) पुरावे**

माहितीपटाची संहिता काल्पनिकतेशी नव्हे तर वस्तुस्थितीशी निगडित असते. माहितीपटामध्ये तथ्य आणि पुरावे असतात.

**२) उद्देश**

माहितीपटाचा उद्देश त्याच्या विषयावरून ठरतो. उदा. सरकारी योजनांची जाहिरात या माहितीपटामध्ये सरकारी योजनांबाबत विस्तृत माहिती जनतेला दिली जाते. अशा पद्धतीने उद्देश ठेवून माहितीपट बनवला जातो.

**३) खर्चाच्या तरतुदीनुसार माहितीपट**

खर्चाच्या तरतुदीनुसार माहितीपट बनवली जातो चित्रपटाच्या तुलनेने माहितीपटाचा खर्च फार कमी असतो. खर्चाच्या तरतुदीनुसार संयुक्त फरक पडतो खर्चाला मर्यादा असतील तर त्या पद्धतीने समितीमध्ये सुद्धा मर्यादा येतात.

**४) विश्वासाहर्याता**

प्रेक्षकांच्या विश्वासार्ह्यतेवर माहितीपटाचे महत्व अवलंबून असते.

**५) लवचिकता**

काल्पनिक चित्रपटांप्रमाणे माहितीपटांमध्ये कोणतीही स्थिर दृश्य आणि संकल्पनात्मक मार्गदर्शक तत्वे नसतात. चित्रपटाच्या तुलनेने माहितीपट लवचिक असतो.

**६) प्रेक्षकांना कृतीप्रवन करणे अथवा त्यांच्यात सकारात्मक बदल घडवणे.**

प्रेक्षकांमध्ये सकारात्मक बदल घडवण्यासाठी माहितीपटाची निर्मिती होत असते. माहितीपट प्रेक्षकांना कृतिप्रवण करतो. माहितीपटाच्या माध्यमातून समाजाच्या वर्तनामध्ये बदल करणे शक्य होते. त्यांना सकारात्मक बदल करण्यास बाध्य करण्याची शक्ती

माहितीपटामध्ये असते.

प्रेक्षकांना कृतीप्रवन करणे आणि त्यांच्या सकारात्मक बदल घडवण्यासाठी माहितीपटाची निर्मिती होत असते.

**७) माहितीपटाची आकर्षक सुरुवात आणि शेवट**

माहितीपटाची सुरुवात जिज्ञासा जागृत करणारी असली की प्रेक्षकांचे अवधान समारोपापर्यंत टिकवून ठेवता येते. प्रेक्षक माहितीपट पाहताना माहितीपटामध्ये शिरला पाहिजे. त्याने परकाया प्रवेश केला पाहिजे या उद्देशाने माहितीपटाच्या संहितेमध्ये कथानकाची रचना केली जावी.

**८) प्रेक्षकांमध्ये विशिष्ट गोष्टीबद्दल किती हॉल निर्माण करणे.**

माहितीपटाची संहिता कुतूहलता निर्माण करणारी असावी. लोकांच्या बुद्धीला चालना देणारी असावी. जी गोष्ट त्यांना माहित नाही अशा गोष्टी त्यांना माहितीपटाच्या माध्यमातून सांगितल्या गेल्या तर त्यांच्यामध्ये कुतूहलता निर्माण होते. संहिते मधील विधाने जिज्ञासा जागृत करणारी हवी. पुढे काय असेल ही भावना सामान्य प्रेक्षकांमध्ये निर्माण झाली तरच प्रेक्षक पूर्ण माहितीपट बघतात.

**माहितीपटाचे महत्वाचे प्रकार**

१) **व्यक्ती विशेष** - व्यक्ती विशेष माहितीपट व्यक्ति केंद्रित असतात. विशिष्ट क्षेत्रातील व्यक्तीच्या कार्यकर्तृत्वाचा परिचयपर आढावा यात घेतला जातो

२) **संस्थेची माहिती देणारा** - सामाजिक सांस्कृतिक आर्थिक व शासकीय संस्थांचा परिचय जनतेला व्हावा या उद्देशाने माहितीपट बनवला जातो यात संस्थेचे कार्य तिची कार्यप्रणाली तिचा इतिहास यावर लक्ष केंद्रित केलेले असते.

३ (**माहितीपर** - एखाद्या स्थळाची, घटनेची इत्यंभूत माहिती सांगणारा माहितीपट माहितीपर असतो. उदा. पहिल्या महायुद्धाच्या कारणांवर तयार झालेला माहितीपट,

४ (**प्रवास वर्णन** - प्रवास वर्णन पर माहितीपटाच्या माध्यमातून एखाद्या स्थळाची माहिती सांगितली जाते. प्रवास का? केव्हा? आणि कसा? करायचा याबाबत माहिती या माहितीपटाच्या माध्यमातून दिली जाते.

५ (**ऐतिहासिक घटना सांगणारे** - हे माहितीपट ऐतिहासिक घटनांवर आधारित असतात.

६ (**इतर** - माहितीपटाला कोणताही विषय वर्ज्य नाही. कोणत्याही विषयावर माहितीपट बनवता येऊ शकतो.

© 2024, SK Publisher All Rights Reserved

**समारोप :**

माहितीपटाच्या संहिता प्रक्रियेची मूलभूत तत्त्वे सदर शोधनिबंधाच्या माध्यमातून विशद केली आहेत. माहितीपट पूर्णपणे संशोधनावर आधारित असतो. शूटिंग करण्याच्या आधी तुम्हाला संहिता असणे आवश्यक असते. संहितेशिवाय माहितीपटाचे तांत्रिक कार्य तथा शूटिंग पूर्ण करणे शक्य नसते. माहितीपटाला कथानक आवश्यक असते. संहिते मधील फ्रेमवर्क मध्ये पात्र आणि संवाद क्रमबद्ध पद्धतीने बसवायला हवे. माहितीपटाची प्रत्यक्ष सुरुवात करण्याआधी माहितीपटाची संहिता संपादित केली पाहिजे. माहितीपटाची संहिता आहे हाच माहितीपटाचा खरा प्राण असतो.

**माहितीपट लेखनाचा नमुना... १**

**मोर्णाकाठचा पांडुरंग माहितीपट**

……… कवडे काका …. लेखक निलेश श्रीकृष्ण कवडे

https://youtu.be/GH342lSwaZ8?si=WEKeaM_xrBoDy3HD

VO 1

पांडुरंग लक्ष्मण कवडे काका यांचा जन्म १ नोव्हेंबर १९२७ रोजी महाराष्ट्रातील अकोला येथे झाला

VO 2

त्यांचे वडील एक साधारण शेतकरी होते परंतु एक जोडधंदा म्हणून ते जय हिंद चौक अकोला येथे सायकलची छोटी दुकान चालवायचे. त्या काळात असदगड किल्ल्यावर त्यांचा कुस्तीचा आखाडा होता. तरुण मुलांना कुस्ती मलखांब इत्यादी शारीरिक प्रशिक्षण ते द्यायचे.

VO 3

पांडुरंग लहानपणापासूनच गाडगे बाबांच्या विचारांनी प्रभावित होते. त्यांचे प्राथमिक शिक्षण नगर परिषद शाळा क्रमांक एक येथे झाले. अभ्यासाची त्यांना आवड होती उच्च प्राथमिक शिक्षण टाऊन शाळेमधून पूर्ण केले.

VO 4

पुढे मोठे झाल्यावर कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत नाजूक असल्यामुळे त्यांनी उगवा विधानसभा आमदार राधा देवी गोयनका यांच्याकडे टायपिस्ट म्हणून काम केले.

VO 5

सोबतच ते 'सावतराम मिल' येथे गिरणी कामगार म्हणून काम करायचे.

VO 6

गिरणी कामगारांच्या समस्या त्यांचे प्रश्न यांची त्यांना जाणीव होती. ते प्रश्न सोडवता सोडवता ते कामगारांचे नेतृत्व करायला लागले आणि येथूनच समाज कार्याची त्यांना आवड निर्माण झाली

SK International Journal of Multidisciplinary Research Hub
Volume 11, Issue 12, December 2024 pg. 198-210

VO 7

गिरणी कामगारांच्या समस्या सोडवत असताना त्यांचे लक्ष सामान्य जनतेच्या प्रश्नांकडे वेधले गेले

VO 8

१९४२ मध्ये विनयकुमार पाराशर यांच्या नेतृत्वात भारत छोडो आंदोलन करण्यात आले तेव्हा त्यांनी या आंदोलनात भाग घेतला होता. स्वातंत्र्यसैनिक देविदास गरड, देशपांडे काका यांच्यासह अनेक सत्याग्रहींची इंग्रज सरकारने धरपकड केल्यावर कवडे काकांनी भूमिगत राहून स्वातंत्र्यचळवळीत आपले अमूल्य योगदान दिले.

VO 9

सावतराम मिल अकोला येथे एक गिरणी कामगार म्हणून उत्कृष्ट कार्य केले. त्यांनी इंदिरा गांधी विशेष हक्कभंग प्रस्ताव विरोधातील सत्याग्रहात भाग घेतला होता. यासाठी त्यांना कारावासही झाला.

१ मे १९८१ रोजी त्यांच्या समाजकार्याला पाहून तत्कालीन राज्यपाल ओम प्रकाश मेहरा आणि मुख्यमंत्री बॅरिस्टर अंतुले यांच्या उपस्थितीत त्यांना 'महाराष्ट्र शासनाचा गुणवंत कामगार पुरस्कार' प्रदान करण्यात आला. त्याकाळी विदर्भातून गुणवंत कामगार पुरस्कार मिळवणारे ते एकमेव कामगार होते

VO 10

१९६७ मध्ये त्यांनी काँग्रेस पक्षाच्या वतीने अकोला नगर परिषद निवडणूक लढवली आणि ते जिंकले. जिंकताच पाणीपुरवठा जलनिस्सारण तसेच नियोजन व विकास या समित्यांमध्ये त्यांना घेण्यात आले. तेव्हापासून ते सलग सहा वेळा निवडून आले सन २००० पर्यंत नगरपरिषदेचे ते सदस्य राहिले.

VO 11

१९९२ मध्ये विनयकुमार पाराशर बाबूजी यांच्या निधनानंतर कवडे काका बिनविरोध नगराध्यक्ष म्हणून निवडले गेले. बिनविरोध नगराध्यक्ष निवडून येण्याची ही घटना अकोला नगर परिषदेच्या इतिहासात एकमेव आहे.

VO 12

नगराध्यक्ष असताना अकोला शहराच्या पाण्याचा प्रश्न कायमचा मिटवण्यासाठी 'काटेपूर्णा प्रकल्पात' त्यांनी महत्त्वाची भूमिका निभावली अकोल्याचा पाणीप्रश्न सोडवण्यासाठी ते आयुष्यभर संघर्ष करीत राहिले इतकेच काय पाण्याच्या प्रश्नाचा अभ्यास त्यांचा इतका वाढला होता की संपूर्ण शहरांमध्ये कुठे कुठे पाईपलाईन टाकली आहे याचा नकाशा त्यांना तोंडपाठ होता. ते अकोला शहर पाणीपुरवठा संघर्ष समितीचे संयोजक होते... अकोला शहरात पाण्याची मोठी पाईपलाईन टाकण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे.

VO 13

महाराष्ट्रात सर्वप्रथम १० टक्के लोक वर्गणी माफ करून शहरासाठी सुधारित पाणीपुरवठा योजना सर्वप्रथम कवडे काकांनी नगराध्यक्ष पदाच्या कार्यकाळात खेचून आणली. अकोला पाणी पुरवठा योजनेअंतर्गत ३५०० लक्ष किमतीच्या सुधारित अंदाजपत्रकास महाराष्ट्र शासन नगर

© 2024, SK Publisher All Rights Reserved

SK International Journal of Multidisciplinary Research Hub
Volume 11, Issue 12, December 2024 pg. 198-210

विकास मंत्रालय यांच्याकडून मंजुरी प्राप्त करून घेतली. महाराष्ट्रात पहिल्यांदाच पाणीपुरवठा योजनेसंबंधी १० % लोकवर्गणी माफ केल्या गेली.

या ऐतिहासिक निर्णयाचे शिल्पकार होते पांडुरंग लक्ष्मण कवडे...

VO 14

ब्रिजलाल बियाणी, आबासाहेब खेडकर, मधुसूदन वैराळे, प्रमिलाताई टोपले, विनयकुमार पाराशर, डॅडी देशमुख, अजगर हुसेन, दादासाहेब दिवेकर आणि हरिभाऊ गोळे या सहकाऱ्यांसोबत काम करण्याच्या मिळालेल्या संधीचे त्यांनी सोने केले.

VO 15

अकोला जनता बँकेच्या स्थापनेसाठी त्यांनी महत्त्वाची भूमिका निभावली. बँकेचे पहिल्या भाग भांडवल जमा करण्यासाठी त्यांनी बरीच धावपळ केली. १९९८-९९ मध्ये अकोला जनता बँकेचे उपाध्यक्ष पद त्यांनी भूषविले. जनता बँकेच्या संचालक पदाची धुरा कवडे काकांनी तब्बल २५ वर्षांपेक्षा जास्त काळ सांभाळली. बँकेच्या समाजाभिमुख उपक्रमात त्यांनी हिरिरीने भाग घेतला. अकोला जनता बँकेच्या संचालक मंडळावर अविरोध निवडून येणारे ते पहिले संचालक होते. स्व. जमनलाल गोयनका व स्व. विनय कुमार पाराशर यांच्या विचारसरणीनुसार काम करून त्यांनी बँकेच्या विकासासाठी आपली हयात खर्च केली. या बँकेत बऱ्याच युवकांना रोजगाराची संधी त्यांनी उपलब्ध करून दिली.

VO 16

अकोल्यात सार्वजनिक गणेशोत्सव व पालखी महोत्सवाचे मंडळ स्थापण्यात त्यांनी महत्वाची भूमिका घेतली. शांतता समितीच्या माध्यमातून त्यांनी प्रभागांमध्ये जातीय सलोखा कायम राखला. काळा मारुती येथे आझाद क्रीडा मंडळाची स्थापना केली. पुढे या मंडळाच्या माध्यमातून कबड्डी स्पर्धांचे आयोजन केले जात होते. ते स्वतः एक उत्कृष्ट हुतुतू पटू होते. अकोला जिल्हा काँग्रेस ब्लॉक अकोला चे अध्यक्ष आणि सचिव पद त्यांनी अनेक वर्ष भूषवले. पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या वीस सूत्री कार्यक्रमात संजय गांधी निराधार योजनेचा लाभ अनेक नागरिकांना मिळवून दिला.

VO 17

अकोला नगरीच्या सुशोभीकरणात नगर विकास फ्रंट चे योगदान अकोलेकर कधीच विसरू शकत नाहीत. विनयकुमार पाराशर यांच्या स्वप्नांना मूर्त रूप देत पांडुरंग कवडे काकांनी असदगड आझाद पार्क व शहिद स्मारक आपले मोलाचे योगदान दिले. या आझाद पार्कचे उद्घाटन १९५९ रोजी करण्यात आले.

VO 18

गांधी जवाहर बाग व नेहरू पार्क या बगीच्यांच्या सौंदर्यीकरणात त्यांनी नगर विकास फ्रंटच्या वतीने महत्त्वाची भूमिका निभावली. याचबरोबर अकोला जनता बँकेचे उपाध्यक्ष असताना त्यांनी गुलझारपुरा स्मशानभूमीचे सुशोभिकरण केले

VO 19

१५ ऑगस्ट १९४७ रोजी देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर काही स्वातंत्र्यसैनिक व युवकांसह पांडुरंग कवडे काकांनी स्वातंत्र्य चळवळीचे प्रतीक म्हणून एक पिंपळाचे झाड भरतिया भवन टिळक रोड येथे लावले होते. नगरपालिका प्रशासनाने या रस्त्यावर दुकाने बांधत असताना हे

पिंपळाचे झाड मध्ये येत होते तेव्हा हे झाड तोडून तेथे दुकान बांधण्याचा बेत प्रशासनाचा होता. परंतु या झाडाचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेऊन पांडुरंग कवडे काकांनी उपोषणाची धमकी प्रशासनाला दिली. या उपोषणाची दखल घेत नगरपालिका प्रशासनाने स्वातंत्र्यसैनिक भाऊसाहेब कोथळकर यांचा अर्धाकृती पुतळा येथे उभारून एक स्मारक आणि पाणपोई उभारली. आज दुर्दैवाने प्रशासनाचे दुर्लक्ष असल्यामुळे वैयक्तिक स्वार्थापोटी हे झाड छाटून टाकण्यात आले आहे आणि पाणपोई सुद्धा बंद पडली आहे...

VO 20

पांडुरंग कवडे काका एक गिरणी कामगार होते गिरणी कामगारांच्या समस्या वर्णी लागाव्यात म्हणून त्यांनी अकोला मजूर संघ इंटक या संघटनेसाठी महत्त्वाचे योगदान दिले. या संघटनेचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले. शेकडो गरजूंना रोजगारांची संधी मिळवून दिली. अकोला मजूर संघाची 'इंटक भवन' ही इमारत उभारण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. कामगारांच्या हक्कासाठी त्यांच्या संघर्षाची दखल स्वतः देशाचे प्रधानमंत्री वी. पी. सिंह तथा केंद्रीय मंत्री पी. ए. संगमा यांनी घेतली होती.

VO 21

पांडुरंग कवडे काका यांच्यावर बालपणापासूनच संत गाडगेबाबा व महात्मा गांधी या दोन महापुरुषांच्या प्रभाव राहिला. त्यामुळे त्यांनी आजन्म खादीचा वापर केला ते शाकाहारी व निर्व्यसनी राहिले. त्यांची जीवनशैली अतिशय साधी सरळ व नम्र राहिली. बरीच वर्षे राजकारणात असून सुद्धा त्यांची मिळकत जितकी वडिलोपार्जित होती तितकीच राहिली. राजकारणामध्ये समाजकारण करून केवळ लोकांचा आशीर्वाद आणि प्रेमच त्यांनी कमावले राजकारणासाठी कधीही तत्वांशी तडजोड केली नाही एक वेळ राजीनामा देईल पण चुकीचे काम करणार नाही असे ते नेहमी म्हणायचे आणि हे त्यांनी खरे करून दाखवले.

VO 22

१९४९ झाली मोर्णा नदीला भयंकर पूर आला होता. तेव्हा त्यांनी पूरग्रस्तांसाठी निवारा आणि अन्नाची सोय केली. मोर्णा नदीच्या पुरापासून संरक्षण करणारी 'संरक्षक भिंत' उभारण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका निभवली. जुन्या शहरातील बालकांना प्राथमिक शिक्षण उपलब्ध व्हावे म्हणून त्यांनी नगर परिषदेची शाळा व अंगणवाडी काळा मारोती परिसरात सुरू केली. जुने शहरातील जय हिंद चौक आधी टांगा चौक... गंगाधर चौक या नावाने ओळखला जायचा परंतु पांडुरंग कवडे काकांनी येथे स्वातंत्र्यसैनिक सुभाष चंद्र बोस यांच्या पुतळ्याचे अनावरण करून या चौकाला जय हिंद चौक हे नाव दिले.

VO 23

एक साधारण गिरणी कामगार ते नगराध्यक्ष असा प्रवास करणारे पांडुरंग कवडे काका यांनी गाडगेबाबांना दिलेला शब्द सार्थ करून दाखवला. यांनी गाडगेबाबांना खरोखरच पांडुरंग बनवून दाखवले. पांडुरंगा सारखा निर्मळपणा साधे भोळेपणा त्यांनी जपला. अनाथांचे नाथ झाले गोरगरिबांसाठी धावून गेले. गाडगेबाबांचे विचार स्वतःमध्ये रुजवून त्यांनी शिक्षण आरोग्य स्वच्छता यासाठी स्वतःचा देह झिजवला. गंगा अवतरण यासाठी भगिरथाने ज्याप्रमाणे साधना केली त्याचप्रमाणे अकोल्याचा पाणीप्रश्न सोडवण्यासाठी भगीरथ प्रयत्न केले.

(अभंग गीत रचना)

डेबूच्या वाटेने । निस्वार्थ झिजून ।।

दिसे उजळून । पांडुरंग ।।

मोर्णा काठावर । होता सेवारत ।।

जणु भगीरथ । पांडुरंग ।।

विठ्ठल चरणी । विलीन व्हायला ।।

आजन्म राबला । पांडुरंग।।

VO 24

असे पांडुरंग कवडे काका वयाच्या ९१ व्या वर्षी २७ डिसेंबर २०१७ ला हा भवसागर तरून पांडुरंगाच्या चरणी अनंतात विलीन झाले.

(VO stand for Voice over)

**सारांश (Abstract):**

चित्रपटांच्या निर्मितीनंतर कालांतराने लोकांना माहिती देण्यासाठी छोट्या छोट्या कालावधींचे लघु चित्रपट निर्मिती सुरू झाली. नभोवाणी करिता केले जाणारे लिखाण केवळ अभिवाचन करण्यासाठी होते. मात्र छायाचित्र आणि चल चित्राच्या माध्यमातून माहिती प्रभावीपणे देता येते हे लक्षात आल्यावर माहितीपटाच्या निर्मितीला चालना मिळाली. अनेक माहितीपट निर्माण केले जाऊ लागले. माहितीपट प्रेक्षकांवर चांगला प्रभाव टाकू लागले. प्रेक्षकांना माहितीपटाच्या माध्यमातून चांगल्या पद्धतीने माहिती देता येते हे लक्षात आल्यानंतर माहितीपट अभ्यासपूर्ण पद्धतीने तयार केले जाऊ लागले. एका चित्रपटाला बनवण्यासाठी लागणाऱ्या सर्व गोष्टी माहितीपटामध्ये कमी प्रमाणात वापरल्या जातात. त्यांचा वापर अतिशय मर्यादित असतो. संहिता लेखन, दिग्दर्शन आणि एडिटिंग अशा पायऱ्यातून माहितीपट जातो. माहितीपटाच्या संहिता लेखनामध्ये अनेक बाबींवर लक्ष ठेवावे लागते. माहितीपट वस्तुस्थितीला अनुसरून बनवलेला असतो. माहितीपट काल्पनिक नसतो. माहितीपटासाठी संदर्भ आणि पुरावे आवश्यक असतात. माहितीपटाची संहिता माहितीपटाचा प्राण असतो. माहितीपटामध्ये जीव ओतण्याचे काम संहिता करते. यावरून माहितीपटाचे संहिता लेखन किती जबाबदारीचे काम आहे हे लक्षात येते. माहितीपटाचे संहिता लेखन करताना तसेच प्रत्यक्ष एडिटिंग करताना अनेक तांत्रिक बाबींवर काम करावे लागते. माहितीपटाचा कालावधी कमी असतो. माहितीपटाचे स्वरूप लघुचित्रपटापेक्षा वेगळे असले तरी माहितीपट हा चित्रपटाचीच एक शैली असतो.

## संदर्भ ग्रंथ

1. मराठी विश्वकोश:
2. मोर्णाकाठचा पांडुरंग माहितीपट https://youtu.be/GH342lSwaZ8?si=WEKeaM_xrBoDy3HD
3. James Monaco. "How to read a film: Movies, Media, Multimedia" Oxford University Press (2000) rd 3 Edition. USA.
4. Sheila Curran Bernard. "Documentary Storytelling for Video and Filmmakers" Focal Press Publications (2004). USA
5. Robert McKee. "Story; Substance, Structure, Style and the Principles of Screenwriting" Harper Collins Publishers (1997). USA.
6. Syd Field. "Screenplay: The Foundations of Screenwriting" Dell Publishing (1994 ) Third Edition. USA
7. Dwight V. Swain with Joye R. Swain. "Scriptwriting; A Practical Manual" Focal Press Publications (1988). USA

8. Das, Trisha. (2007) How to Write a Documentary Script. Public Service Broadcasting Trust: New Delhi.
9. Kilborn, Richard and Izod, John. (1997) An Introduction to Television Documentary:
10. व्यावसायिक लेखन प्रथम सत्र MAR 124 पुस्तक क्रमांक 2 पटकथा लेखन M.A. Marathi YCMOU Nashik
11. शब्दगंध भाग तीन पटकथा लेखन - कविता मुरूमकर (संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ)

:::. Cite this article .:::

कवडे, निलेश श्रीकृष्ण. & नागरे, प्रा. डॉ. शिवाजी. (2024). माहितीपटाचे संहिता लेखन. Two Day National Interdisciplinary Conference on Script Writing, 198–210.

https://doi.org/10.61165/sk.publisher.script.writing.2024.43